राज्यातील दुष्काळजन्य परिस्थितीचा पार्श्वभुमीवर शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कायमस्वरूपी/तात्पुरता वीज पुरवठा खंडीत असलेल्या सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा पुर्वरत करणे व थकबाकी असल्याने नवीन वीज जोडणी प्रलंबित असलेल्या पाणी पुरवठा योजनांच्या नवीन वीज जोडणीबाबत.

महाराष्ट्र शासन
ऊर्जा विभाग
शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण-२०२६ /प्र.क्र.३६०/ऊर्जा-५
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३० ऑक्टोबर २०२६.

प्रस्तावना :-

मा. मंत्री महसूल यांच्या अध्यक्षतेखालील दि. २७.१०.२०२६ रोजी मंत्रिमंडळ सभागृह, ७ वा मजला, मंत्रालय येथे अपुऱ्या पावसामुळे उद्भवलेल्या दुष्काळ जन्य परिस्थितीचा आढावा घेवून उपाययोजना सूचविण्यासाठी स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक पार पडली.

सदर बैठकीत मंत्रिमंडळ उप समितीच्या शिफारशीनुसार शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडीत असलेल्या सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांबद्दल तसेच पाणीपुरवठा योजनांच्या नवीन वीज जोडण्यांबद्दल चर्चा झाली. याबाबत, राज्यात दुष्काळ परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, महावितरण कंपनी मार्फत वीज पुरवठा बंद असलेल्या पाणी पुरवठा योजनांचा वीज पुरवठा पुर्ववत करणे आणि विद्युत देयकांची थकबाकी असल्याने नवीन वीज जोडणी प्रलंबित असलेल्या योजनांना नवीन वीज जोडणी देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन आहे.

शासन निर्णय :-

मा. मंत्री महसूल यांच्या अध्यक्षतेखालील दि. २७.१०.२०२६ रोजी मंत्रिमंडळ सभागृह, ७ वा मजला, मंत्रालय येथे अपुऱ्या पावसामुळे उद्भवलेल्या दुष्काळ जन्य परिस्थितीचा आढावा घेवून उपाययोजना सूचविण्यासाठी स्थापन केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक पार पडली. सदर बैठकीत शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कायमस्वरूपी/तात्पुरता वीज पुरवठा खंडीत असलेल्या सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांबद्दल तसेच पाणीपुरवठा योजनांच्या नवीन वीज जोडण्यांबद्दल चर्चा झाली. मा. मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीस अनुसरून शहरी व ग्रामीण सार्वजनिक पाणीपुरवठा योजनांच्या वीज पुरवठयासदंर्भात उपाययोजना करण्यास खालीलप्रमाणे शासन मान्यता देण्यात येत आहे :-

अ) तात्पुरत्या/ कायमस्वरूपी बंद असलेला वीज पुरवठा पुर्ववत करणे :- सदर योजनांची मालकी असणाऱ्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने नियमानुसार एक महिन्याच्या वीज देयकांची सुरक्षा ठेव रक्कम व पुनर्जोडणी शुल्क अदा केल्यास सदर पाणी पुरवठा योजनेचा वीज पुरवठा चालू करण्यात यावा.

आ) नवीन पाणीपुरवठा योजनांना वीज जोडणी देणे :- सद्याची दुष्काळी परिस्थिती पाहता, थकबाकीच्या कारणास्तव प्रलंबित असलेल्या नवीन वीज जोडण्या नियमानुसार लागणारे वीज जोडणी शुल्क अदा केल्यास संबधित सार्वजनिक पाणीपुरवठा योजनेस नवीन वीज जोडणी देण्यात यावी.

२. वरील प्रमाणे कायमस्वरूपी/तात्पुरत्या स्वरूपात वीज पुरवठा बंद असलेल्या तसेच थकबाकी असल्याने नवीन वीज जोडणीसाठी प्रलंबित असलेल्या पाणीपुरवठा योजनांना वीज कनेक्शन देण्याची कार्यवाही खालील अटींच्या अधीन राहून करण्यात येईल.

१. सदर योजनेत समाविष्ट असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या हद्दीमध्ये /कार्यक्षेत्रात टँकरव्दारे पाणी पुरवठा होणार नाही याबाबत जिल्हाधिकारी /CEO यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२. खंडीत वीज पुर्नजोडणी /नवीन वीज जोडणी होत असलेल्या ठिकाणी वापरायोग्य पाणी स्त्रोत /साठा उपलब्ध असल्याचे जिल्हाधिकारी /CEO यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

३. सदर वीज पुर्नजोडणी/ नवीन वीज जोडणी दिल्यानंतर येणारे पहिले व तद्नंतर दर महिन्याचे वीज देयक नियमितपणे (अंतिम तारखेच्या आत) भरण्याची जबाबदारी संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेची राहील. सदर वीज देयक सुरक्षा ठेव रक्कम व पुनर्जोडणी शुल्क भरणा हा DPDC /टंचाई निधी/ १६ वा वित्त आयोग तथा कोणत्याही इतर निधीतून भरण्यात यावे. पाणी पुरवठा वीज जोडणी /वीज देयके यासंदर्भात कोणतीही बाब न्यायप्रविष्ठ असल्यास, अशा योजनाबाबतची कार्यवाही मा. न्यायालयाच्या निर्णयानुसार करण्यात यावी.

४. उपरोक्त उपाययोजना या शासनाने दुष्काळ कालावधीसाठी वेळोवेळी जाहीर केलेल्या आदेशांपुरत्या मर्यादित राहतील.

५. सदर नियमाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी महावितरण कंपनीची राहील. याअनुषंगाने आवश्यक त्या सुचना तातडीने निर्गमित करण्यात याव्यात.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्र. २०२६१०३०१५५९०९८०५३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NARAYAN SHRIKRISHNA KARAD

Digitally signed by NARAYAN SHRIKRISHNA KARAD
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRIES ENERGY LABOUR AND MINING DEPARTMENT, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AE7FAEABAF4571C2748E4DD5FFD2CD108DE0E130859970F4D7D0EE40046B3E9E, cn=NARAYAN SHRIKRISHNA KARAD
Date: 2026.10.30 16:00:35 +05'30'

(नारायण कराड)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.

२. अध्यक्ष/उपाध्यक्ष विधानसभा/सभापती/उप सभापती विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई ३२

३. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई -३२.
४. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मुंबई -३२.
५. मा. उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क व क्रिडा व युवक कल्याण) यांचे सचिव, मुंबई -३२.
६. मा.मंत्री महसूल तथा अध्यक्ष मंत्रिमंडळ उपसमिती
७. मा. मंत्री (अपारंपारिक ऊर्जा), मंत्रालय, मुंबई -३२.
८. मा. राज्यमंत्री (ऊर्जा), मंत्रालय, मुंबई -३२.
९. सर्व मा.मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१०.सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य
११.मा. मुख्य सचिव तथा अपर मुख्य सचिव (नियोजन) मंत्रालय, मुंबई-३२.
१२.अपर मुख्य सचिव (वित्त) मंत्रालय, मुंबई-३२.
१३.अपर मुख्य सचिव (ऊर्जा), ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१४. अपर मुख्य सचिव (नगर विकास), मंत्रालय, मुंबई-३२.
१५. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७.सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी, फोर्ट, मुंबई.
१९.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, प्रकाशगड, बांद्रा (पूर्व), मुंबई.
२०.सर्व विभागीय आयुक्त.
२१.सर्व जिल्हाधिकारी.
२२. आयुक्त (सर्व महानगरपालिका).
२३. मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व जिल्हापरिषद).
२४. मुख्याधिकारी (सर्व नगरपरिषद/नगरपंचायती).
२५. कार्यासन अधिकारी, (अर्थसंकल्प/व्यय-१६), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२६. निवड नस्ती (ऊर्जा-५), ऊर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२७. ऊर्जा विभागातील सर्व कार्यासने.